पुरस्कार

# श्री. संजय पवार ‘पर्यटनमित्र’चे मानकरी



**नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात, पोलिस आयुक्त श्री. दीपक पांडे यांच्या हस्ते ‘पर्यटनमित्र’ पुरस्कार स्वीकारताना ‘पूर्वा केमटेक’ आणि ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार. समवेत प्रशासन उपजिल्हाधिकारी श्री. भीमराज दराडे, पर्यटन उपसंचालक श्री. नितीनकुमार मुंडावरे, महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. जगदीश चव्हाण, ‘तान’चे अध्यक्ष श्री. राजेंद्र बकरे आदी मान्यवर.**

कृषी आधारित निविष्ठा उद्योगाचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळत असतानाच, ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’ चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.’ या शेतीमाल प्रक्रिया व्यवसायाची उभारणी केली. या दरम्यान बव्हंशी दुर्लक्षित तरीही कृषी उत्पादनवाढ, स्वयंरोजगार या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण अशा मधमाशीपालन या विषयाने त्यांना आकर्षित केले. या साऱ्यांतून प्रबोधन, प्रशिक्षण आणि व्यवसाय अशी त्रिस्तरीय मांडणी करण्याचा त्यांचा संकल्प सिद्धीला गेला आहे.

या संकल्पनेतून नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथे मुखेड रोडवर साकारलेले ‘बसवंत कृषिउद्योग पर्यटन संकुल’ पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरते आहे. स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेची संकल्पना मांडणारे आदर्श गाव सेवरगांव, फळप्रक्रिया उद्योग आणि प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाच्या आधुनिक सुविधा उपलब्ध असलेले मधमाशी पालन केंद्र येथे कार्यान्वित आहे. याबरोबरच विविधरंगी फुलांनी नटलेला सारा परिसर सर्वसामान्य नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच कृषिक्षेत्रातील अभ्यासकांच्या जिव्हाळ्याचा विषय ठरतो आहे. याची उचित दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयातर्फे श्री. संजय पवार यांना जागतिक पर्यटन दिनानिमित्त ‘पर्यटनमित्र’ पुरस्कार देण्यात आला. ‘पूर्वा परिवारा’ला या पुरस्काराचा सार्थ अभिमान वाटतो. ■